# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे – ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune – 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. ७६ /२०२५

## "भारतरत्न जे.आर.डी. टाटा अर्थसहाय्य योजना"

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागून आर्थिक अडचणींचा सामना न करता पीएच्.डी. संशोधन करण्याची संधी प्राप्त होवून त्यातून राष्ट्रपयोगी दर्जेदार संशोधन विद्यार्थ्यांकडून घडावे या हेतूने विद्यापीठ विभाग व विद्यापीठाशी संलग्नित संशोधन केंद्रातील प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांकरीता सन २०१८ पासून **"भारतरत्न जे.आर.डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना"** लागू करण्यात आली आहे. सदर योजनेचे शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून **"भारतरत्न जे.आर.डी. टाटा अर्थसहाय्य योजना"** असे नाव बदलण्यात आले आहे.

सदर योजनेनुसार विद्यापीठ परिसरातील विभागामध्ये पीएच्.डी. करणाऱ्या गुणवत्तेनुसार जास्तीत जास्त १०० विद्यार्थ्यांची तसेच प्रत्येकी संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थांतील संशोधन केंद्रांमध्ये पीएच्.डी. करणाऱ्या मा. प्राचार्य/संचालक यांनी शिफारस केलेल्या गुणवत्तेनुसार जास्तीत जास्त ०२ विद्यार्थ्यांची कमाल तीन वर्षांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

सदर अर्थसहाय्य योजनेसाठी विद्यापीठ शैक्षणिक विभागात व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्रावरील पीएच्. डी. प्रवेशप्रक्रिया पूर्ण करून **दि. ३१/०८/२०२१ ते दि. २१/०४/२०२५** या कालावधीमध्ये पीएच्. डी. अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने **दि. २१/०४/२०२५** पर्यंत खालीलप्रमाणे विहित केलेल्या नियम व अटीनुसार अर्ज मागविण्यात येत आहे.

**नियम व अटी :**

१. पीएच्. डी. अभ्यासक्रम अर्धवट मध्येच सोडून दिल्यास अथवा अभ्यासक्रम पूर्ण करताना इतरत्र पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ नोकरी केल्यास अर्थसहाय्याची दिलेली रक्कम विद्यार्थ्यास विद्यापीठाकडे परत जमा करावी लागेल.
२. सदर अर्थसहाय्य योजना लागू असलेल्या विद्यार्थ्यांना अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.
३. विद्यार्थ्यांने इतर कोणत्याही दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.
४. विद्यार्थी पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ नोकरी करीत नसावा.
५. प्रत्येक विद्यार्थ्याची हजेरी त्या–त्या महिन्यात ७५ टक्के असणे आवश्यक असून विद्यार्थ्यांची हजेरी बायोमॅट्रीक पध्दतीने, मार्गदर्शक व संबंधित विभागप्रमुखांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील. तसेच सदर विद्यार्थ्याच्या पीएच्. डी. नोंदणी दिनांकापासून उपस्थितीबाबतचे प्रमाणपत्र मार्गदर्शक व विभागप्रमुख/प्राचार्य यांचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.
६. सदर योजना लागू असलेल्या विद्यार्थ्यांना पीएच्. डी. अभ्यासक्रमासाठी लागू असलेले इतर सर्व नियम व अटी बंधनकारक राहतील.
७. सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्यच्या संपुर्ण कालावधीत आपल्या संशोधनाशी निगडीत एका कार्यशाळेत सहभाग घेवून तसेच प्रमाणपत्र सादर करणे व Refereed Journals मध्ये किमान एक लेख (Article) प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

८. सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांना दर सहा महिन्याने प्रगती अहवाल (Progress Report) विहित केलेल्या Research Advisory Committee मार्फत सादर करणे बंधनकारक राहील.

९. फिल्ड वर्क मध्ये केलेले कामकाज मार्गदर्शकाने तपासणे आवश्यक आहे. फिल्डवर्कसाठीच्या रजेचा कालावधी प्रथम मार्गदर्शक व विभागप्रमुख यांच्याकडून मान्य करून घेणे आवश्यक राहिल, तद्नंतरच सदर कालावधी अर्थसहाय्यसाठी ग्राह्य धरण्यात येईल. मान्यतेचे पत्र अर्थसहाय्यसाठी सादर करणे आवश्यक राहील.

१०. सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी ते नोकरी करत नसल्याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

११. सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी Form No. 16 किंवा ITR Return Receipt देणे बंधनकारक राहील.

१२. विद्यार्थ्याच्या पालकांचे (कुटूंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रू. २,५०,०००/– पेक्षा जास्त नसावे. यासाठी संबंधित तहसिलदाराचा दाखला आवश्यक राहील.

१३. सदर योजनेसाठी विद्यापीठ शैक्षणिक विभागातील मा. विभागप्रमुख/संचालक यांनी अर्जदार विद्यार्थ्यांची शिफारस करण्यात यावी. तसेच विद्यापीठ संलग्नित संशोधन केंद्रातील मा. प्राचार्य/संचालक यांनी गुणवत्तेनुसार केवळ दोन विद्यार्थ्यांची शिफारस करावी.

भारतरत्न जे.आर.डी. टाटा अर्थसहाय्य योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील त्यांच्या Ph.D. Tracking Account मधून ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यास **दि. २३/०३/२०२५ ते दि. २१/०४/२०२५** पर्यंत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत खाली नमूद केलेल्या कागदपत्रासह तसेच संशोधन मार्गदर्शक व मा. विभागप्रमुख/मा. प्राचार्य/मा. संचालक यांच्या शिफारशीसह (सही व शिक्का) **दि. २६/०४/२०२५** पर्यंत शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७ या कार्यालयात पोहोचेल अशा पध्दतीने सादर करावेत. विहित मुदतीनंतर हस्तपोच/टपालाने प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. सदर अर्जास मा. विभागप्रमुख/मा. प्राचार्य/मा. संचालक यांनी BOD लॉगीन मधून सदर अर्जास मान्यता देण्यात यावी.

**आवश्यक कागदपत्रे :–**

१. पदवी/पदव्युत्तर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. (Marks Statement of Master Degree)
२. पीएच्.डी. प्रवेशपत्र. (Provisional/Confirmation Admission Letter)
३. हमीपत्र. (Undertaking on Plain Paper)
४. संशोधनाबाबतचा संक्षिप्त गोषवारा. (Brief proposal of Topic Research)

उशिराने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

23/3/2025

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/०५३
दिनांक : २३/०३/२०२५

प्रत :– माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग/मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था/ संशोधन केंद्र प्रस्तुत विद्यापीठ.

सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

D/Vishnu/JRD TATA/TRD TATA Circular